सं. फौ. प्र. क्र. – ९८६/२०१६
सरकार वि. विजय
**निशाणी क्र. १६**

**सरकार तर्फे साक्षीदार क्र. १ यांचा शपथेवर जबाब**

**सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की,**

| | | |
|---|---|---|
| **माझे नाव** | – | अमोल वासुदेवरावजी काळे, |
| **वय** | – | ३९ वर्ष, धंदा – मजूरी, |
| **राहणार** | – | पुसला, ता.– वरुड, जि.– अमरावती |

---

**सरकारतर्फे सरतपास श्री. एम. ए. यावले, सरकारी वकीलांतर्फे**

१. मी आरोपीला ओळखतो. मी भोजराज राऊत यांना ओळखत नाही. घटनेच्या दिवशी मी कामावरुन येत होतो. एक जण दारु पिवून आम्हाला आडवा आला त्यामुळे आम्ही पडलो. आम्ही मोटर सायकलवर होतो. त्या मोटर सायकलवर मी व आरोपी होतो. त्यावेळी मला व आरोपीला लागले होते. आम्ही दोघे सरकारी दवाखान्यात गेलो होतो. ही घटना धनोडी जवळ वरुड रोडवर घडली होती. पोलीसांनी माझे बयान घेतले नव्हते तसेच चौकशी सुध्दा केली नव्हती. जो व्यक्ती आमच्या पुढे आला होता त्याला मी ओळखत नाही. या व्यतिरीक्त मला काहीही माहीत नाही. घटना कोणत्या वर्षी घडली हे मला आठवत नाही.

**साक्षीदाराने अभियोग पक्षाला पाठींबा दिला नाही त्यामूळे सरकारी वकीलांनी साक्षीदाराला उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली–परवानगी मंजूर.**

२. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक १०/०३/२०१६ रोजी संध्याकाळी ०७.३० ते ०८.०० वाजेच्या दरम्यान आम्ही सालबर्डी यात्रेतून धनोडी गावाकडे येत होतो. हे म्हणणे खरे आहे की, ती मोटर सायकल माझ्या गावातील भोजराज यांची होती व तो माझ्या सोबत होता. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी एक इसम आम्हाला आडवा आला व त्याला आमचा धक्का लागला त्यामुळे आम्ही खाली पडलो. साक्षीदार पुन्हा सांगतो की, त्याच्या धक्क्याने आम्ही पडलो होतो. त्या धक्क्यामुळे

आम्हाला लागले होते. हे म्हणणे खरे आहे की, विजयच्या डोक्याला मार लागला होता. हे मला माहीत नाही की, त्याच्या टोंगळयाला सुध्दा मार लागला होता. हे म्हणणे खरे नाही की, तेव्हा तेथील लोकांनी आम्हाला उचलले आणि सरकारी दवाखाना वरुड येथे नेले. हे मला माहीत नाही की, त्यानंतर विजयचा भाऊ सुरज तिथे आला व त्याने आम्हाला तसेच त्या पडलेल्या व्यक्तीला इर्विण दवाखाना अमरावती येथे नेले. हे मला माहीत नाही की, त्या अनोळखी इसमाला सुध्दा मार लागला होता. हे मला माहीत नाही की, तो इसम ३५ ते ४० वर्षाचा होता व दारु पिवून होता. हे मला माहीत नाही की, तो वार्ड क्र. ३० मध्ये तसेच विजय हा वार्ड क्र. १६ मध्ये भरती होता. हे मला माहीत नाही की, त्यावेळी विजय काळे ने अकर्ते याला फोन लावला होता व मला घेवून जा असे म्हणाला होता. हे म्हणणे खरे आहे की, विजयला ३ ते ४ दिवसांनी सुटी झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, तो अनोळखी इसम त्यानंतर कुठे भरती झाला हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक १४/०३/२०१६ रोजी विजयला दवाखान्यातून सुटी मिळाली व आम्ही घरी परत आलो. आता मला माझ्या बयानातील अधोरेखांकित भाग 'अ' वाचुन दाखविला. तो बरोबर नाही. पोलीसांनी तो माझ्या बयानात का लिहीला याचे कारण मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०६/०६/२०१६ रोजी पोलीसांनी माझे पुरवणी बयान घेतले होते. आता मला माझ्या पुरवणी बयानातील अधोरेखांकित भाग 'अ' वाचुन दाखविला. तो बरोबर नाही. पोलीसांनी तो माझ्या बयानात का लिहीला याचे कारण मी सांगु शकत नाही. पोलीसांकडून मला समजले की, त्या इसमाचे नाव अम्मीलाल संमल धुर्वे रा. घोडेगाव, ता.– जुन्नारदेव असे होते. हे मला माहीत नाही की, तो श्याम मोहोड यांच्या खोपडीवर तो कामाला होता. हे मला माहीत नाही की, त्या गाडीचा क्र. एमएच–२७/एबी–१६८३ असा होता. आता मला माझ्या बयानातील अधोरेखांकित भाग 'अ' वाचुन दाखविला. तो बरोबर नाही. पोलीसांनी तो माझ्या बयानात का लिहीला याचे कारण मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, विजय माझ्या गावात राहतो. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे मी त्याला वाचविण्याकरीता आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास आरोपी तर्फे श्री. पी. एल. वानखडे विधीज्ञ</u>**

**<u>उलटतपास – नाकारला.</u>**

**<u>फेरतपास – नाही</u>**

वा.दा.ब.अ.क.केले

THAKARE ISHWAR JAMSING

Digitally signed by THAKARE ISHWAR JAMSING
Location: CJJD & JMFC, WARUD
Date: 2026.01.19 17:24:02 +0530

**(आय. जे. ठाकरे)**

दिनांक : १९/०१/२०२६

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र. १,वरुड.